**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः16.07.2024** **वारःमंगळवार**

---

**ठळक बातम्या**

यंदाच्या खरीप हंगामात देशभरात आतापर्यंत 5 कोटी 75 लाख हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर पेरणी

शेतकऱ्यांना पीक विमा भरण्यासाठी 31 जुलैपर्यंत मुदतवाढ

अंगणवाडी मदतनीसांची 14 हजार 690 रिक्त पदं लवकरच भरणार

**आणि**

मराठा आणि ओबीसी आरक्षणावरून निर्माण झालेला तणाव निवळण्यासाठी पुढाकार घेण्याचं छगन भुजबळ यांचं शरद पवार यांना आवाहन

**पेरणी**

देशात यंदाच्या खरीप हंगामात आतापर्यंत 5 कोटी 75 लाख हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर पेरणी झाली आहे. केंद्रीय कृषी मंत्रालयानं काल या संदर्भातली आकडेवारी जाहीर केली. देशात 62 लाख हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर कडधान्य, 1 कोटी 40 लाख हेक्टर क्षेत्रावर तेलबिया, तर 1 कोटी 15 लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर भात लावणी झाली आहे. सर्वच प्रकारच्या पिकांच्या पेरणीचं क्षेत्रं गेल्या वर्षीच्या तुलनेत वाढलं आहे.

**पेरण्या**

राज्यातही समाधानकारक पाऊस झाल्यानं खरीपाच्या पेरण्यांना वेग आला आहे. नाशिक जिल्ह्यात खरीपाच्या 70 टक्के पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. जिल्ह्यात खरीपाचं क्षेत्र 6 लाख 41 हजार हेक्टर आहे; त्यापैकी 4 लाख 55 हजार हेक्टर क्षेत्रावर पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. पालघर जिल्ह्यात पावसाचा जोर कमी झाल्यानं  जिल्ह्यात सर्वत्र भात रोपणीच्या कामांना वेग आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधान आहे.

**पीकविमा**

प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत एक रुपयात पीक विमा भरण्याची मुदत येत्या 31 जुलैपर्यंत वाढवण्यात आली आहे. या योजनेची अंतिम मुदत कालपर्यंत म्हणजे 15 जुलैपर्यंत होती. मात्र, राज्यातील अनेक शेतकऱ्यांनी अजूनही पीक विमा भरलेला नाही; त्यामुळे पीक विमा भरण्यासाठी मुदतवाढ देण्याची मागणी कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी केंद्र सरकारकडे केली होती. त्यांच्या मागणीनंतर ही मुदत 31 जुलैपर्यंत वाढवण्यात आली आहे.

**महागाई**

देशात अन्नधान्य, विशेषतः भाज्या आणि उत्पादनांच्या किंमतीत झालेल्या वाढीमुळे घाऊक किंमतीवर आधारित चलनफुगवट्याचा दर गेल्या महिन्यात 3 पूर्णांक 36 शतांश टक्क्यांवर गेला आहे. यात सलग चौथ्या महिन्यात वाढ नोंदवण्यात आली. हा दर मे महिन्यात 2 पूर्णांक 61 शतांश टक्के होता.

**तटकरे**

राज्यातील अंगणवाडी मदतनीसांची 14 हजार 690 रिक्त पदं लवकरच भरण्यात येणार असल्याची माहिती, महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. एकात्मिक बाल विकास सेवा

योजनेंतर्गत राज्यातील जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामीण आणि आदिवासी प्रकल्पातील अंगणवाडी केंद्रांमध्ये मदतनीसांची अनेक जागा रिक्त आहेत. येत्या 31 ऑगस्टअखेर राज्यातील मदतनीसांची रिक्त पदं भरण्यात यावीत, अशा सूचना सर्व जिल्हा आणि प्रकल्प स्तरावर देण्यात आल्या आहेत; याबाबतची जाहिरात लवकरच प्रसिद्ध होणार असल्याचं तटकरे यांनी सांगितलं.

**कौशल्य**

कौशल्य ही आजच्या काळाची गरज आहे; प्रत्येकाकडे आपल्या व्यवसायातलं  कौशल्य असणं आवश्यक आहे, असं केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी काल संगितलं. जागतिक कौशल्य दिनानिमित्त मुंबईत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कौशल्य आणि व्यवसाय शिक्षण मंडळातर्फे विविध क्षेत्रातील प्रशिक्षणार्थींना तसंच उत्कृष्ट औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना यावेळी पारितोषिकं देण्यात आली. या विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा, राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, यांच्यासह अन्य अधिकारी यावेळी उपस्थित होते.

**भुजबळ**

मराठा आणि ओबीसी आरक्षणावरून राज्यात तयार झालेला तणाव निवळण्यासाठी शरद पवार यांनी पुढाकार घ्यावा, अशी विनंती आपण त्यांना केल्याचं मंत्री छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांची त्यांच्या मुंबईतल्या निवासस्थानी काल भेट घेतल्यानंतर भुजबळ पत्रकार परिषदेत बोलत होते. या भेटीमागे कोणताही राजकीय हेतू नसल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. यामध्ये कोणतंही राजकारण न आणता येत्या दोन दिवसांत आपण या विषयावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करू, तसंच राज्यातल्या प्रमुख नेत्यांशी चर्चा करून हा प्रश्न कसा सोडवता येईल ते पाहू, असं पवार यांनी म्हटल्याचं भुजबळ यांनी सांगितलं.

**बैठक**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर येत्या रविवारी, 21 तारखेला भाजपाच्या प्रदेश पातळीवरील पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष, खासदार, आमदार  आणि अन्य प्रमुख कार्यकर्त्यांचं व्यापक अधिवेशन पुण्यात होणार आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्यासह राज्यातले सर्व केंद्रीय मंत्री, राज्यमंत्री या अधिवेशनाला उपस्थित राहणार आहेत. राज्यातील प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या महाविकास आघाडीच्या विरोधात केल्या जाणाऱ्या मोर्चेबांधणीबद्दल महत्वपूर्ण चर्चा आणि काही निर्णय या अधिवेशनात घेतले जातील अशी माहिती भाजपाच्या पुण्यातील स्थानिक पदाधिकाऱ्यांनी काल दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तिसऱ्या कार्यकाळातील निर्णयांची तसंच राज्यातील महायुतीच्या सरकारने घेतलेल्या अनेक महत्वाच्या निर्णयांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचावी यासाठी राज्यात संवाद यात्रा काढली जाणार आहे. पक्षाचे सर्व पदाधिकारी संवाद यात्रेच्या माध्यमातून राज्यातील कानाकोपऱ्यात पोहचणार असल्याची माहिती पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल नागपूरमध्ये  माध्यमांना दिली.

**समिती**

पंढरपूरच्या आषाढी एकादशी वारीसाठी राज्य सरकारनं मंत्र्यांची समन्वय समिती स्थापन केली आहे. त्यामध्ये चंद्रकांत पाटील, गिरीश महाजन आणि तानाजी सावंत यांचा समावेश आहे. सावंत यांची पंढरपूर शहरासाठी समन्वयक मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

**आरोप पत्र**

संसदेत घुसखोरी केल्याप्रकरणी दिल्ली पोलिसांनी अमोल शिंदे याच्यासह मनोरंजन डी, ललित झा, महेश कुमावत, सागर शर्मा आणि नीलम आझाद या सर्व सहा आरोपींच्या विरोधात आरोपपत्र दाखल केलं आहे. या सर्व आरोपींना दोन ऑगस्ट रोजी न्यायालयात हजर करून सुनावणी होणार आहे. या

सर्वांनी गेल्या वर्षी 13 डिसेंबर रोजी संसदेत घुसखोरी केली, तसंच लोकसभेचं कामकाज सुरू असतांना प्रेक्षक गॅलरीमधून दालनात उतरत धुराच्या नळकांड्या फोडल्या होत्या.

**कोकण रेल्वे**

कोकण रेल्वे मार्गावर दिवाणखवटी स्थानकाजवळ दरड कोसळल्याने बंद झालेला मार्ग 24 तासांच्या अथक प्रयत्नांनंतर काल अखेर सुरू करण्यात आला. मात्र अनेक तास रेल्वेगाड्याही थांबल्यानं प्रवाशांचे प्रचंड हाल झाले. मंगलोर एक्सप्रेसमधील 513 प्रवाशांना काल कणकवली स्थानकातून मुंबईला रवाना करण्यात आल. त्यासाठी एसटी. महामंडळाच्या 12 बसेसची व्यवस्था करण्यात आली होती.

**निधन**

प्रसिद्ध उद्योजक आणि कॅम्लिन उद्योगसमूहाचे आधारस्तंभ, सुभाष दांडेकर यांचं काल मुंबईत निधन झालं. ते 85 वर्षांचे होते. कला आणि उद्योग क्षेत्रातील अनेकांसाठी ते मार्गदर्शक होते. अनेक सामाजिक - स्वयंसेवी संस्थांना आणि उपक्रमांना पाठबळ देण्याचं काम त्यांनी केलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दांडेकर यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**हवामान**

राज्यात येत्या 24 तासात बहुतांश भागात मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असून, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**